| MHDH040005102025 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०८/०९/२०२५ | | |
| | नोंदणी दिनांक | : | ११/०९/२०२५ | | |
| | निकाल दिनांक | : | ०८/०४/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०० | ०६ | २८ |

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२१/२०२५ मधील न्यायनिर्णय</u>

**(निशाणी क्र. २१)**

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र.XXXII प्रमाणे**

**भाग-'अ'**

**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. ०२), दोंडाईचा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती. आर. डी. पवार)**

**निकाल तारीख ०८/०४/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२१/२०२५**

**सीएनआर क्र. एमएचडीएच ०४०००५१०२०२५**

**(अपराध क्र. ३६/२०२५, दोंडाईचा पोलीस ठाणे)**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र राज्य,<br>तर्फे प्रभारी अधिकारी,<br>दोंडाईचा पोलीस ठाणे,<br>ता. शिंदखेडा, जि. धुळे |
| **सरकार तर्फे विद्वान वकील** | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. लाली |
| **आरोपी** | | कल्याण दिलीप पाटील,<br>वय-३६ वर्षे, व्यवसाय- मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| | | रा. मांडळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |
| **आरोपीतर्फे विद्वान वकील** | | ॲड. श्री. ए.बी.भावसार |

**भाग-'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १७/०२/२०२५ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | १७/०२/२०२५ |
| दोषारोप-पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ११/०९/२०२५ |
| अपराधाचा तपशील सांगितल्याचा दिनांक | २९/११/२०२५ |
| पुरावा आरंभ झाल्याचा दिनांक | १६/०१/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०८/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | **--** |

**आरोपीचा तपशील**

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जमानतीवर सोडल्याचा दिनांक** | **दोषारोपामधील कलमे** | **दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी** | **देण्यात आलेली शिक्षा** | **फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कल्याण दिलीप पाटील | सी.आर.पी. सी.४१(१) प्रमाणे नोटीस | २९.११. २०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई प्रमाणे | निर्दोष मुक्त | - | - |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांकः ०८/०४/२०२६)

आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयांकरीता संपरिक्षेचा सामना केला आहे.

०२. **<u>अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत खालीलप्रमाणे -</u>**

दिनांक १७/०२/२०२५ रोजी सायंकाळी १२.५० वाजता मांडळ शिवारातील हॉटेल वेदांशच्या भिंतीच्या आडोशाला आरोपी हा अवैधरित्या देशी व विदेशी दारुचा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आला म्हणून आरोपी विरुध्द महाराष्ट्र प्रोव्हीबीशन कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे दोंडाईचा पोलीस स्टेशन ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे तक्रार दाखल करण्यात आली.

०३. त्यानुसार आरोपी विरुध्द गुन्हा रजि. क्र. ३६/२०२५ अन्वये नोंद होऊन तपासी अमलदार यांनी तपासकामी आरोपीस फौ. प्र. सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस दिली व तपासाअंती पुरेसा पुरावा मिळाल्याने आरोपी विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपीला नि.क्र. ०९ अन्वये गुन्हयाचा तपशील स्पष्ट करुन त्याचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

०५. अभियोग पक्षाच्या पुराव्यानंतर दोषसिध्दी परिस्थिती असल्यामुळे आरोपीचे फौ. प्र. सं. चे कलम ३१३ नुसार निवेदन १९ वर नोंदविले आहे. आरोपीच्या बचावानुसार, त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केलेला आहे. असा बचाव त्याने घेतलेला आहे.

०६. प्रस्तुत खटल्यामध्ये न्यायनिर्णय करीत असतांना, माझे विचारार्थ निघालेले मुद्दे आणि त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक १७/०२/२०२५ रोजी सायंकाळी १२.५० वाजता मांडळ शिवारातील हॉटेल वेदांशच्या भिंतीच्या आडोशाला आरोपी हा अवैधरित्या देशी व | |

| | | |
|---|---|---|
| | विदेशी दारुचा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आला आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २) | अंतिम आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करणेत येते. |

## कारणमिमांसा

०७. अभियोग पक्ष हा भाग-'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे तोंडी व कागदोपत्री असलेल्या पुराव्यावर अवलंबुन राहीला आहे. आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे निवेदन नि. क्र. १९ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे. त्यामध्ये, त्याने अभियोग पक्षाचा पुरावा नाकारुन त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे. आरोपीने त्याच्या बचावार्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

०८. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. लाली यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपीतर्फे विव्दान विधीज्ञ श्री. भावसार यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ करीता :-**

०९. अभियोग पक्षाने आरोपी त्याच्या ताब्यात बेकायदेशीररीत्या वर नमूद दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता, हे सिध्द करणे आवश्यक आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे गुन्हा सिध्दतेसाठी एकूण ०२ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी कृष्णा जगन माळवे (साक्षीदार क्र.०१) या अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदाराने त्याच्या पुराव्यादरम्यान अभियोग पक्षाला सहाय्यभूत ठरेल अशी साक्ष दिलेली नाही. सदर पंच साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने विद्वान सरकारी

अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासास्वरुप प्रश्न विचारले. परंतु, त्याद्वारे देखील अभियोग पक्षाच्या हकिकतीस पुष्टी देणारा कोणताही पुरावा अभियोग पक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.०२ पो.कॉ.१६३८/ महेश निळकंठ शिंदे (फिर्यादी) यांनी त्यांच्या निशाणी क्रमांक १६ वरील पुराव्यात असे कथन केले की, दिनांक १७/०२/२०२५ ते दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे हजर असताना पोलीस निरीक्षक परदेशी यांना गुप्तदार यांच्या मार्फत बातमी मिळाली की, मांडळ शिवारात दारुची चोरटी विक्री होत आहे. पो.स.ई.कुमावत यांनी दोन पंचांना पोलीस स्टेशनला बोलवले व बातमीची हकीकत सांगितली. ते पंच म्हणून येण्यास तयार झाले. त्यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी आणि ०२ पंच असे शासकीय वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेले. घटनास्थळी एक इसम पृष्ठयाच्या खोक्यात काहीतरी घेऊन बसलेला दिसून आला. त्यांनी १२.५० वाजता पंचांसमक्ष छापा टाकून त्या इसमास त्याचे नांव गाव विचारले असता त्याने त्याचे नांव कल्याण दिलीप पाटील असे सांगितले. त्याच्याकडे एका पृष्ठयाच्या खोक्यात वेगवेगळया कंपन्यांची विदेशी दारु मिळून आली.

११. साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले आहे की, सदर पंचनामा श्री. कुमावत यांनी केला. जप्त मुद्देमालापैकी प्रत्येकी एक बॉटल नमुन्याकामी काढून सीलबंद केली. त्यावर कागदी लेबल लावून त्यांनी व पंचानी सहया केल्या. त्यानंतर आरोपी व मुद्देमालासह ते पोलीस स्टेशनला आले त्यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १७ वरील फिर्याद नोंदविली.

१२. प्रस्तुत साक्षीदाराचा आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने असे मान्य व कबूल केले आहे की, कोणत्या कंपनीच्या बाटल्या होत्या हे सांगता येणार नाही असे कथन करुन त्या नंतर लगेचच कंपनी सांगता येईल परंतु किती बाटल्या होत्या हे सांगता येणार नसल्याचे सांगितले. तसेच १२.५० वाजता पंचनामा केल्याचे व १२.५० वाजताच फिर्याद दिल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे जप्त मुद्देमालाचा बॅच नंबर फिर्यादीत नमूद नसून तो सांगता येणार नसल्याचे देखील स्पष्टपणे मान्य केले आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता

सदरहू साक्षीदाराच्या कथनांवर संशय निर्माण होण्यास वाव आहे.

१३. साक्षीदार क्र.०२ फिर्यादी यांनी अभियोग पक्षाच्या हकिकतीस मदत होईल अशी साक्ष दिल्याचे वरील पुराव्यावरुन स्पष्ट होते. परंतु, साक्षीदार क्रमांक ०१ या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्याच्या पुराव्यामध्ये आरोपीच्या प्रस्तुत गुन्हयाशी कोणताही संबंध आहे, हे दर्शविणारे तथ्य शाबीत झालेले नाहीत. प्रस्तुत प्रकरणी घटनास्थळ-नि-जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. त्यामुळे, आरोपीविरुध्द त्याच्या ताब्यातून पंचांसमक्ष दारु जप्त झाली होती, असा निष्कर्ष काढणे रास्त होणार नाही. सबब, प्राप्त परिस्थितीमध्ये अभियोग पक्षाने केलेल्या आरोपाप्रमाणे खरोखरच आरोपीच्या ताब्यातून वरील वर्णनाची दारु मिळून आली होती व ती पंचांसमक्ष जप्त झालेली होती, ही बाब ठोस पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही. केवळ पोलीस कर्मचारी असलेल्या साक्षीदार क्र. ०२ (फिर्यादी) याच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहून तसा निष्कर्ष काढणे न्यायोचित होणार नाही.

१४. तसेच, प्रस्तुत खटल्यामध्ये जप्त मुद्देमालापैकी १८० मी.ली. हे सी.ए. तपासणीसाठी नमुन्याकामी काढण्यात आल्याचे फिर्यादीने पुराव्यात सांगितले असले तरी देखील सी.ए. तपासणीचा अहवाल देखील अभिलेखावर दाखल केलेला दिसत नाही. त्याकारणे, उपरोक्त साक्षीदार क्र. २ ची साक्ष अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द अभिकथीत केलेले आरोप सिध्द करण्याकरीता पुरेशी ठरणारी नाही.

१५. वरील विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत पोहोचले आहे की, प्रस्तुत खटल्याचे कामी अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून मिळून आल्याचे व जप्त झाल्याचे व सी. ए. तपासणीकरीता नमुन्याकामी काढलेला मुद्देमाल हा ह्याच गुन्हयातील असल्याचे कोणत्याही संयुक्तिक शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरलेला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता</u>** :-

१६. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्यात अभियोग पक्ष

अयशस्वी ठरल्याकारणाने मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे. सबब, आरोपीची या खटल्यातून निर्दोषपणे मुक्तता करणे न्यायोचीत होणारे आहे. सबब, मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

## आदेश

१. आरोपी कल्याण दिलीप पाटील यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करणेत येते.

३. आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये, रुपये १५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक मुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन द्यावा.

४. जप्त मुद्देमाल ओ.सी. ब्ल्यू कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या एकूण १६ सीलबंद बाटल्या, डी.एस.पी.ब्लॉक कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या एकूण ०८ सीलबंद बाटल्या, मॅजिक मुमेन्ट रोमीक्स कंपनीची १८० मि.ली. मापाच्या एकूण ०४ सीलबंद बाटल्या आणि मॅगडॉल नं. वन कंपनीच्या १८० मि.ली. मापाच्या एकूण १२ सीलबंद बाटल्या नियमाप्रमाणे नाश करण्यात याव्यात व त्याचा सविस्तर पंचनामा करुन तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

सही/-

स्थळ **:** दोंडाईचा

दिनांक **:** ०८/०४/२०२६

**(आर. डी. पवार)**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. ०२), दोंडाईचा

**ग-'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | कृष्णा जगन माळवे | साक्षीदार | १४ |
| २. | महेश निळकंठ शिंदे | फिर्यादी | १६ |

**ब) बचाव पक्ष, असल्यास :-**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| - | - | - |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| - | - | - |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची/निशाणींची यादी**

**अ) अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | १५ | पंच साक्षीदाराची अ.क्र.०१ वरील सही |
| २. | १७ | फिर्यादीची फिर्यादवरील सही |

**ब) <u>बचाव पक्ष</u> :-**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| - | - | - |

**क) <u>न्यायालयीन</u> :-**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| - | - | - |

**ड) <u>भौतिक वस्तु</u> :-**

| **अ.क्र.** | **भौतिक वस्तू क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| - | - | - |

सही/-

स्थळ : दोंडाईचा **(आर. डी. पवार)**

दिनांक : ०८/०४/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. ०२), दोंडाईचा

– **<u>प्रमाणपत्र</u>** –

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | सुनिल डी. मासुळे, |
| न्यायालयाचे नांव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा (न्यायालय क्रमांक ०२) |
| पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०८/०४/२०२६ |

सही/–

लघुलेखक